
नीतिन बोस

नीतिन आणि मुकूल बोस

कॅमेऱ्याचे किमयागार

भारतीय चित्रपट तंत्रज्ञांचे पितामह म्हणून ओळखले जाणारे आणि १९७८मध्ये दादासाहेब फाळके पुरस्काराने ज्यांना सन्मानित करण्यात आलं ते सिनेमेटोग्राफर नीतिन बोस आणि त्यांचे बंधू मुकूल बोस यांच्या समृद्ध चित्रपट जीवनावर एक नजर...

□ रजनीकुमार पंड्या

प्रकरण: ६

देवकी बोस द न्यू थिएटर्समधून अनपेक्षितपणे बाहेर पडल्यामुळे *चंडीदास*चं दिग्दर्शन नीतिन बोस यांच्याकडे आलं. पण दिग्दर्शनाची इच्छा त्यांच्या मनात अनेक वर्षांपासून होती. मागाहून ते भारतीय सिनेमा टेक्निकचे पितामह म्हणून ओळखले गेले ते त्यांच्या ठायी असलेल्या या जन्मजात प्रतिभेमुळेच.

१८९७ च्या २७ एप्रिल रोजी कोलकात्याच्या एका सुखवस्तू कुटूंबात जन्मलेल्या नीतिनना त्यांच्या वडिलांनी लहानपणीच मुव्ही कॅमेरा खरेदी करून दिला होता. त्यांच्या नऊ मुलांपैकी बाकीच्यांना क्रिकेटचं वेड होतं, पण नीतिन आणि मुकूल या भावंडांना मात्र कॅमेऱ्याचं आकर्षण अधिक होतं. विशेषतः त्या काळी गाजलेल्या जे. एफ. मादन (मागाहून मादन थिएटर्स नावाच्या चित्रपट निर्मिती संस्थेची स्थापना करणारे) यांच्यामुळे त्यांना तंबूत दाखवल्या जाणाऱ्या मूकपटाचं-बायोस्कोपचं वेड लागलं.

नीतिन आणि मुकूलचे वडील स्वतः हेअर ऑईल बनवण्याच्या व्यवसायात होते. पण त्यातून वेळ काढून ते त्या काळी ज्याच्यावर **ध्वनीमुद्रण** होत असे त्या मेणाच्या भुंगळ्या बनवण्याचा व्यवसायही करत असत. रायचंद बोराल यांचे वडील लालचंद बोरालच्या संगीताचं रेकॉर्डिंग त्यांनी १९०४ साली केलं होतं. नीतिन-मुकूल यांचं हे सुदैवच म्हणायचं की, त्यांच्या वडिलांनी मुलांची आवड ओळखून योग्य वेळीच त्यांच्या हातात कॅमेरा दिला होता. इतकंच नाही तर इंग्लंड-अमेरिकेत या विषयावर प्रकाशित होणारी पुस्तकंही ते मुद्दाम मुलांसाठी मागवून घेत असत. १९१४ साली आपल्या मुलांसाठी त्यांनी एक लहानसा सिनेमा प्रोजेक्टरही मागवून घेतला होता. त्याचा वापर कसा करायचा, प्रोजेक्टर कसं काम करतो या गोष्टी त्यांनी मुलांना व्यवस्थित समजावून सांगितल्या होत्या. सतरा वर्षांच्या वयाला नीतिनकडे स्वतःचा अधुनिक कॅमेरा, प्रोजेक्टर आणि प्रिन्टिंग मशीन अशी तयारी होती. कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांचे एकुलते एक पुत्र रथीन्द्र म्हणजेच रथीनदा त्यांचे खास मित्र झाले होते. एकदा त्यांनी आपल्या या मित्राची ओळख रवींद्रनाथना करून दिली होती. रवींद्रनाथनी ताबडतोब त्यांना शांतीनिकेतनमधल्या मुलींच्या 'उत्तरायण' नृत्याचं चित्रीकरण करायची जबाबदारी सोपवली. नीतिनदांनी काहीशा संकोचानेच ते काम स्वीकारलं, पण अशा कौशल्याने पार पाडलं की सतरा मिनिटांची ती फिल्म कविवर्यांनी वारंवार पाहिली आणि आपल्या शांतीनिकेतनमधल्या मुलींनाही दाखवली. त्यांनी नीतिनला खास भोजनाचं निमंत्रण दिलं आणि सर्वांसमक्ष त्यांच्या कामाचं कौतुक केलं. त्यावेळी नीतिनदांना अश्रू आवरणं कठीण झालं होतं.

त्याच सुमारास बेल्जियमचे राजा-राणी भारतभेटीवर आले होते. त्यांच्या स्वागत समारंभाचं चित्रीकरण करायचं काम नीतिनदांना मिळालं. हे कामंही त्यांनी अवघ्या बावीसाव्या वर्षी असं काही सुंदर रित्या पार पाडलं की, हॉलीवूडच्या एका प्रसिद्ध कंपनीच्या विलियम फॉक्सनी त्यांची ती छोटीशी डॉक्युमेंटरी खरेदीच केली. याच विलियम फॉक्सनी पुढे 'ट्वेंटियेथ सेन्च्युरी फॉक्स' नावाच्या विश्वविख्यात चित्रपट निर्मिती संस्थेची स्थापना केली.

या यशानंतर नीतिनदांनी चित्रपट फोटोग्राफीचा एक व्यवसाय म्हणून गंभीरपणे विचार करायला सुरुवात केली. १९२०मध्ये त्यांना

त्रिपुराच्या खेडा जंगलात हत्तींच्या टोळीच्या जीवनमानाचं चित्रीकरण करण्याचं काम त्यांना महाराजांकडून मिळालं. (प्रसिद्ध संगीतकार सचिनदेव बर्मनही याच राजघराण्याचे वंशज होते.) त्यांनी करीमबक्ष या आपल्या प्रामाणिक साथिदारासह अडीच महिने जंगलातला सगळा परिसर पिंजून काढला. हत्तींच्या कळपामागे कॅमेरा घेऊन फिरण्यात अनिश्चितता तर होतीच शिवाय ते काम जीवाच्या जोखमीचंही होतं. तो सिनेमाही विलियम रेन्डोल्प हर्स्ट, हॉलीवूड यांनी खरेदी केला आणि न्यू यॉर्कच्या इंटरनॅशनल न्यूज रील कॉर्पोरेशनद्वारा प्रदर्शित केला. त्यासाठी नीतिनदांना एका फुटामागे एक डॉलर इतकं कमी मानधन चुकवण्यात आलं होतं. त्यावेळी एका डॉलरचा भाव दोन रुपये साडे दहा आणे इतका होता. त्यावेळी त्यांच्या वयोवृद्ध आईने फरच्या चामड्याच्या निर्यातीचा वडिलांचा धंदा जो नीतिनदा सांभाळत होते, तो गुंडाळून सगळं लक्ष कॅमेऱ्यावरच केंद्रित कर असा सल्ला दिला. १९२४मध्ये बॉम्बे टॉकीजच्या हिमांशु राय यांच्या *लाईट ऑफ एशिया* या मूकपटात सहाय्यक म्हणून काम केलेल्या दक्षिण भारतीय जयगोपाल पिल्लाइ यांनी त्यांना *पुनर्जन्म* या आपल्या चित्रपटाचे कॅमेरामन आणि फिल्म प्रोसेसिंगचं काम सोपवलं. त्या सिनेमात कॉम्फी हेयड नावाची एक बंगाली अँग्लो इंडियन मुलगी केदार चटर्जी यांच्या


मुकूल बोस

नायिकेचा रोल करत होती. नीतिनदांच्या कॅमेऱ्याने तिचं सौंदर्य पडद्यावर अधिकच खुलवलं होतं. याचं चित्रीकरण जयपूरला झालं आणि १९२५मध्ये तो मूकपट धरमतल्ला येथे प्रदर्शितही झाला. त्यातील अद्भूत कॅमेरावर्कचं सगळीकडे कौतुक झालं आणि त्याचं श्रेय अर्थातच नीतिनदांच्या फोटोग्राफीला जातं.

१९२६मध्ये नीतिनदांकडे *देवदास* नावाच्या एका मूकपटाच्या छायांकनाचं काम सोपवण्यात आलं, त्याचं दिग्दर्शन नरेश मित्र यांनी केलं होतं. लक्ष्मीविलास हेअर ऑइल कंपनीचे मालक नागेन बोस यांनी या चित्रपटाला अर्थसाहाय्य दिलं होतं. त्यामुळे नीतिनदा महागडे कॅमेरे आणि साहित्य वापरून चित्रपट अधिक दर्जेदार करू शकले. त्यानंतर १९३५मध्ये द न्यू इंडिया थिएटर्सच्या बॅनरखाली बनलेल्या *देवदास* या बोलपटाच्या छायांकनाचं सुपरविजनही त्यांनीच केलं होतं.

छायांकनाच्या क्षेत्रात हळू हळू नीतिनदांचं नाव होऊ लागलं होतं. म्हणूनच द न्यू थिएटर्सच्या बी.एन. सरकार यांच्या इंटरनॅशनल फिल्म क्राफ्टमध्ये मुख्य सिनेमेटोग्राफरची जबाबदारी सांभाळण्याचा प्रस्ताव त्यांच्याकडे आला. ही जबाबदारी सांभाळत असताना त्यांनी *चोर कांटा* आणि *चासेर मेये*चं छायांकनही सांभाळलं. १९३०-३१मध्ये बोलपटांचं आगमन झालं. द न्यू थिएटर्सचा पहिला बोलपट *देना पावना*चं कॅमेरावर्क त्यांनी सांभाळलं होतं. अर्थात बोलपटांचं छायांकन करण्यासाठी आवश्यक असलेल्या खास तंत्राची माहिती करून घेण्यासाठी त्यांनी भारतातील पहिला बोलपट *आलम आरा*च्या निर्मितीच्या वेळी त्याचे दिग्दर्शक अरदेशर इरानी यांच्याकडे मुंबईला दीड महिना प्रशिक्षण घेतलं होतं. त्याच सुमारास त्यांचे लहान बंधू मुकूल बोस यांनीही अमेरिकेहून आलेल्या रेकॉर्डिंग निष्णात विलियम डेमिंग यांच्याकडे रेकॉर्डिंगचं प्रशिक्षण घेतलं होतं. अर्थात, मुकूल बोस इलेक्ट्रॉनिक्समध्ये रिसर्च स्कॉलर म्हणून प्रसिद्ध होते आणि त्यांचे आजोबा जे.सी. बोस यांच्या इंस्टिट्यूटमध्ये त्यांनी प्रशिक्षण घेतलेलं होतं. अर्थात, मुकूल बोस यांचं पुढे आकस्मिक निधन झालं. पण नीतिन बोस मात्र दीर्घायुषी ठरले. १९७८मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. १९८६मध्ये त्यांचं निधन झालं. अशाप्रकारे द न्यू थिएटर्सच्या *चंडीदास*(१९३४) पासून त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी आपल्या कौशल्याच्या जोरावर हिंदी चित्रपटांना कॅमेऱ्याची एक खास भाषा मिळवून दिली. नीतिन आणि मुकूल बोस या दोन्ही भावंडांसारख्या अनेक कुशल, निष्णात आणि प्रशिक्षित पण कर्मठ लोकांचं योगदान मोलाचं होतं, हे त्याकाळी *चंडीदास*ला मिळालेल्या अभूतपूर्व यशावरून सिद्ध होतं.

त्याच वर्षी प्रदर्शित झालेल्या *रुपलेखा* (बंगाली आणि हिंदी) या चित्रपटातून प्रथमेश बरुआ नावाच्या आणखी एका प्रतिभावंत कलाकाराचा उदय झाला. तेही कसे प्रतिभावंत होते आणि त्यांचं या क्षेत्रातलं योगदान कसं मोलाचं होतं, त्यांची जीवनशैली कशी रोमांचक होती, त्याचबरोबर द न्यू थिएटर्सच्या वाटचालीत त्यांचा वाटा काय होता याविषयी पुढच्या लेखांमधून जाणून घेऊ या. **क्रमशः**

हत्तींच्या कळपामागे कॅमेरा घेऊन फिरण्यात अनिश्चितता तर होतीच शिवाय ते काम जोखमीचंही होतं. तो सिनेमाही विलियम रेन्डोल्प हर्स्ट, हॉलीवूड यांनी खरेदी केला आणि न्यू यॉर्कच्या इंटरनॅशनल न्यूज रील कॉर्पोरेशनद्वारा प्रदर्शित केला. त्यासाठी त्यांना फुटामागे एक डॉलर इतकं मानधन चुकवण्यात आलं होतं.